**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गंत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता "व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती" योजनेस मान्यता देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : आविवि-२०१९/प्र.क्र.७४/का-१२**
मंत्रालय, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २९ जुलै, २०१९

**संदर्भ :-**

१. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.औप्रसं-१२०४/प्र.क्र.२३/का-१२, दि.२३.०८.२००४.
२. केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेकरिता केंद्र शासनाने दि.०१.०७.२०१० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दि.१४.०५.२०१५.
४. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.व्यअप्र-२०१६/प्र.क्र.१२२/का.१२, दि.३१.०३.२०१६.
५. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.आयटीसी-२२१७/ प्र.क्र.९९/ व्यशि-३, दि.२९.०५.२०१९.

**प्रस्तावना :-**

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गंत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गंत अभ्यासक्रमांसाठी केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या समाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० प्रवेश सत्रापासून प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेस मान्यता देण्यात आली आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना केंद्र शासन पुरस्कृत पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर योजनेंतर्गत निश्चित केल्यानुसार इयत्ता १० वीच्या पात्रतेवर आधारीत अभ्यासक्रमांमध्ये ITI चा समावेश करण्यात आलेला आहे. योजनेंतर्गत आय.टी.आय. अभ्यासक्रमाचा समावेश गट IV मध्ये करण्यात आला आहे. तसेच आदिवासी रोजगाराभिमुख व्यावसायिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण या राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या

योजनेंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या निवासी विद्यार्थ्यांना रू.६०० व वसतीगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रू.५०० इतकी रक्कम निर्वाह भत्त्याच्या स्वरूपात देण्यात येते. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखालील खाजगी विना अनुदानित संस्थांमध्ये निवडक व्यावसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी आदिवासी विकास विभागाने संदर्भ क्र.४ येथील दि.३१.०३.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काची १००% प्रतिपुर्ती करण्यास मान्यता दिलेली आहे.

आता कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने दि.२९.०५.२०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप) पीपीपी योजनेंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सन २०१९-२० प्रवेश सत्रापासून व्यवसाय प्रशिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीचे लाभ देण्यासाठी “व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती” योजनेस शासन याद्वारे मान्यता देत आहे.

२. सदर व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना खालीलप्रमाणे राहील :-

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील अभ्यासक्रमांच्या शासकीय तसेच पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१४.०५.२०१५ रोजीच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता प्रशिक्षण शुल्काच्या १००% इतक्या रकमेची प्रतिपूर्ती अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

२. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील पीपीपी योजनेंतर्गत गठीत करण्यात आलेली संस्था व्यवस्थापन समिती व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या बॅक खात्यामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यवसाय प्रशिक्षण शुल्काच्या अनुज्ञेय प्रतिपुर्तीची रक्कम महाडिबीटी पोर्टलच्या माध्यमातून जमा करण्यात येईल.

३. प्रस्तूत योजनेंतर्गंत पुढील अटीं व शर्तींची पूर्तता करणारे विद्यार्थी व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करीता पात्र राहतील.

१. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. सदर विद्यार्थ्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील पीपीपी योजनेंतर्गंत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेद्वारे प्रवेश घेणे बंधनकारक राहील. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था व्यवस्थापन कोट्यातील जागांवर प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सदर योजना लागू राहणार नाही.

३. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश करताना विद्यार्थ्याने मूळ TC वर प्रवेश घेतला असावा. डुप्लीकेट TC वर प्रवेश असेल तर योजनेंतर्गत लाभ देण्यात येऊ नये.

४. विद्यार्थ्याने यापूर्वी खाजगी व शासकिय औद्योगिक संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमांचा लाभ घेतलेला नसावा.

५. तसेच राज्य/केंद्र शासनाच्या विभागाने अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण कंपन्या अथवा महामंडळे यांनी पुरस्कृत केलेल्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.

६. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

७. इयत्ता १० वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी रू.८.०० लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्या व इयत्ता १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अभ्यासक्रमासाठी रू.२.५१ लाख ते ८.०० लाख या उत्पन्नाच्या मर्यादेत उत्पन्न असणाऱ्या ST विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

परंतु इयत्ता १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अभ्यासक्रमासाठी रू.२.५० लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्या ST विद्यार्थ्यांना केंद्रशासनाच्या पोस्टमॅट्रीक योजनेचे लाभ अनुज्ञेय असल्यामूळे त्यांना या योजनेचे लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

८. DGT, नवी दिल्ली अथवा MSCVT यांनी मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांच्या प्रवेशित जागांवर प्रवेश घेणे बंधनकारक राहील.

९. सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहील.

१०. सदर योजनेंतर्गंत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार प्रशिक्षणार्थ्यांची प्रवेशित अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण वर्गातील उपस्थिती ही, DGT, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या निकषानुसार असणे आवश्यक राहील. सदर उपस्थिती आधार संलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर नोंदविणे आवश्यक राहील.

११. अर्जदार विद्यार्थ्यांस प्रत्येक सत्र परिक्षा अथवा वर्षाची परिक्षा देणे आवश्यक राहील. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परिक्षा देणे शक्य झाले

नसल्यास तसे विद्यार्थी व संबंधित संस्थेने शिफारस केल्यानंतर प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

१२. संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमित असणे अथवा गैरहजर रहाणे इत्यादी स्वरूपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्यांकरीता संस्थेला शुल्क प्रतिपुर्ती अनुज्ञेय राहणार नाही.

१३. या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांने प्रशिक्षण मध्येच सोडले तर अशा विद्यार्थ्यांकरीता संस्थेला अथवा संस्था व्यवस्थापन समितीस अदा करण्यात आलेली प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती राज्य शासनास योग्य वाटल्यास वसुल करण्यात येईल.

४. सदर योजनेमध्ये व त्याच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास रहातील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यांस व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस अथवा विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या विरूध्द करता येणार नाही.

५. या प्रयोजनार्थ सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीवर सर्व प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती नोंदविणे आवश्यक राहील. सदर बायोमॅट्रीक प्रणाली स्वखर्चाने सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

६. कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने शासकिय व खाजगी औद्यागिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या प्रशिक्षण शुल्कामध्ये भविष्यात केलेले बदल/ सुधारणा व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेकरीता लागू राहतील.

७. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. सदर योजनेकरीता निधीची तरतूद व खर्च करण्यासाठी स्वंतत्र लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक वित्त विभागाच्या व महालेखापालांच्या मान्यतेने उघडण्यात येईल. तसेच शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून १ महिन्याच्या आत सदर योजनेकरीता आवश्यकतेनुसार निधीची मागणी करण्याची जबाबदारी आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांची राहील.

९. सदर शासन निर्णय हा कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या शासन निर्णय क्र.आयटीसी-२२१७/प्र.क्र.९९/व्यशि-३, दि.२९.०५.२०१९ मधील परिच्छेद ९ मधील तरतुदीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०८०११२५२२७४३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.08.01 12:57:38 +05'30'

**( सु. ना. शिंदे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव,यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, कौशल्य व उद्योजकता विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११.आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१२.सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व).
१३.अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर.
१४.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
१६.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१७.महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१८. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१९.अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई.
२०.निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई.
२१.जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व).

**प्रत,**

१. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. मा. अध्यक्ष, विधान सभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई .
४. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई .
५. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. निवड नस्ती. (का-१२)